महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १६६ वा | दिनांक : ०४/०४/२०२५ | वार : शुक्रवार

## आम्हाला शिर्डी, तिरुपती बोर्डावर घेणार का? इम्तियाज जलील यांचा भाजपला सवाल



**छत्रपती संभाजीनगर :** एमआयएमचे नेते तथा माजी खासदार इम्तियाज जलील यांनी वक्फ सुधारणा विधेयकावरून भाजपवर तिखट हल्ला चढवला आहे. भाजप वक्फ सुधारणा विधेयकाद्वारे वक्फ बोर्डात हुशार नॉन मुस्लिम सदस्य आणणार आहे. मग आमच्या समाजात हुशार लोक नाहीत का? आता ते आम्हाला शिर्डी व तिरुपती संस्थानच्या बोर्डावर घेणार का? केवळ वक्फसाठीच हा निर्णय का? असे विविध प्रश्न जलील यांनी या प्रकरणी उपस्थित केलेत.

लोकसभेने बुधवारी मध्यरात्री २ वा. वक्फ सुधारणा विधेयकावर आपली मोहोर उमटवली. इम्तियाज जलील यांनी गुरुवारी या प्रकरणी बोलताना भाजपवर टीकेची झोड उठवली. ते म्हणाले, आम्ही वक्फ सुधारणा विधेयकाला विरोध केला. हा विरोध यापुढेही कायम असेल. कालच्या भाषणातून त्यांनी केवळ मुस्लिम समाजाचा विषय घेतला. त्यातून वाद निर्माण केला. ट्रिपल तलाक झाला. औरंगजेब झाला. आता या विधेयकाच्या माध्यमातून नवा मुस्लिम विरोध सुरू करण्यात आला आहे. या प्रकरणी समर्थन व विरोधाच्या आकड्यात फार मोठा फरक नाही. सरकार मुस्लिम समाजाला न्याय देण्यासाठी व महिलांना बोर्डात स्थान देण्यासाठी हे विधेयक आणल्याचा दावा करत आहे. पण त्यांनी लाडक्या बहिणींना न्याय दिला का?

मी सुरुवातीपासून वक्फ सुधारणा विधेयकाच्या विरोधात होतो. वक्फ बोर्ड जो निर्णय घेत होता तो निर्णय घेण्याचा अधिकार आता या विधेयकाच्या माध्यमातून जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आला आहे. सरकारने वक्फ बोर्डावर बिगर मुस्लिमांना घेण्याचा निर्णय घेतला आहे सरकार असेच करणार असेल, तर तुम्ही इम्तियाज जलीलला शिर्डीच्या साईबाबा संस्थान मंदिराच्या बोर्डावर घेणार का? तिरुपती बालाजी येथील ट्रस्टवर मला घेणार का? असा सवालही इम्तियाज जलील यांनी यावेळी उपस्थित केला.

या प्रकरणी सर्वात जास्त जमिनी वक्फ बोर्डाकडे असल्याचा दावा केला जात आहे. पण सरकारने कोणत्या नेत्याच्या नावावर किती जमीन आहे याची आकडेवारी काढावी. त्यांना वस्तुस्थिती समजेल. अनेक राजकीय नेत्यांनी वक्फ बोर्डाच्या जमिनी हडप केल्या आहेत. या विधेयकांतर्गत पंतप्रधान मोदींच्या निकटवर्तीयांना जमिनी देण्याचा घाट घालण्यात आला आहे. सरकारला नवा कायदा आणण्याची काहीच गरज नव्हती. आता आम्हाला सुप्रीम कोर्टाकडून कोणतीही अपेक्षा राहिली नाही. तिथे प्रामाणिक लोक असणे गरजेचे आहे. तेथील न्यायाधीश सेवानिवृत्त झाल्यानंतर मोदींकडे जावून बसतात, असेही जलील यावेळी बोलताना म्हणाले.

## मुंबईत पोलिसांकडून हाय अलर्ट जारी



**मुंबई :** शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीने मुंबई पोलिसांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता मुंबईत महिनाभरसाठी ड्रोन, रिमोट कंट्रोल मायक्रोलाइट एअरक्राफ्ट, पॅरा ग्लायडर आणि हॉट एअर बलून उडवण्यावर बंदी घातली आहे. यासंदर्भात मुंबई पोलिसांनी एक परिपत्रक जारी केले आहे. ही बंदी ४ एप्रिल २०२५ पासून ५ मे २०२५ पर्यंत लागू केली जाणार आहे.

पोलिस आयुक्तालायकडून या संदर्भात परिपत्रक जारी करण्यात आले आहे. या परिपत्रकात म्हटले आहे की, दहशतवादी किंवा राष्ट्रविरोधी घटक ड्रोन, रिमोट-कंट्रोल मायक्रोलाइट एअरक्राफ्ट, पॅरा ग्लायडर आणि हॉट एअर बलूनचा वापर करुन दहशतवादी हल्ला तसेच शहरातील व्हीव्हीआयपी व्यक्तींना लक्ष्य करण्यासाठी करू शकतात. मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक जीवन धोक्यात आणू शकतात. शहरातील गर्दीची ठिकाणे देखील लक्ष्य केली जाऊ शकतात. सार्वजनिक मालमत्तेची नासधूस करू शकतात आणि बृहन्मुंबई पोलिस आयुक्तालय क्षेत्रात कायदाव सुव्यवस्था बिघडवू शकतात. या अनुषंगाने सर्व प्रकारच्या ड्रोन वापरावर बंदी घालण्यात आली आहे.

तसेच या आदेशाचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २२३ अन्वये दंडनीय असेल, असेही या परिपत्रकात म्हटले आहे. सर्व संबंधितांना वैयक्तिकरित्या नोटीस बजावली जाऊ शकत नसल्यामुळे, याद्वारे एकतर्फी आदेश पारित करण्यात आला आहे, असेही परिपत्रकात म्हटले आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वीच मुंबई पोलिसांच्या खंडणीविरोधी पथकाने अंधेरी परिसरातून कुख्यात गुंड बिश्नोई गँगच्या पाच सदस्यांना अटक केली आहे. त्यांच्याकडून ७ पिस्तुले, २१ काडतुसे, एक इंटरनेट डोंगल आणि एक मोबाईल सीमकार्ड जप्त करण्यात आले आहे. तसेच अटक करण्यात आलेल्या सदस्यांचा मुंबईतील एका उद्योगपती आणि अभिनेत्यावर हल्ला करण्याचा कट असल्याचे सांगण्यात आले आहे.

## पुरुष हक्क आयोगाची स्थापना करावी, तृप्ती देसाई

**सोलापूर :** देशात तसेच राज्यातील अनेक भागांमध्ये कौटुंबिक कलहातून पुरुष आत्महत्या करत असल्याच्या तसेच पती-पत्नीच्या वादातून पतीची हत्या केल्याच्या अनेक घटना समोर येत आहेत. उत्तर प्रदेशमध्ये घडलेल्या घटनेने तर एकच खळबळ उडवली होती. प्रियकराच्या मदतीने पत्नीने आपल्याच पतीची हत्या करून त्याचे तुकडे करत एका ड्रममध्ये ठेवले होते. या पार्श्वभूमीवर आता पुरुष हक्क आयोगाची स्थापना करण्यात यावी अशी मागणी केली जात आहे.

राज्यात सध्या ज्या पद्धतीने महिलांकडून क्रूर हत्येचे प्रकार समोर येत आहेत, ते पाहता पुरुषांना न्याय व अधिकार देण्यासाठी पुरुष हक्क आयोगाची स्थापना करण्याची गरज वाटू लागली असल्याचे भूमाता ब्रिगेड संघटनेच्या प्रमुख तृप्ती देसाई यांनी म्हटले आहे. पुरुष आणि महिला दोघांनाही समान न्याय असला तरी पूर्वी महिलांवर होणारे अत्याचार थांबवण्यासाठी महिला आयोगाची स्थापना झाली होती. मात्र, सध्याच्या काळात महिला ज्या पध्दतीने वागत आहेत, ते पाहता पुरुषांसाठी पुरुष हक्क आयोगाची निर्मिती करण्याची वेळ आली असल्याचे तृप्ती देसाई यांनी म्हटले आहे.

तृप्ती देसाई म्हणाल्या, नुसते समुपदेशन करून भागणार नसून महिलांनाही आपण काय वागतो याची जाणीव ठेवणे गरजेचे आहे. राज्यात पुरुष हक्क आयोग स्थान झाल्यास पुरुषांनाही न्याय व अधिकार मिळतील. महिलांच्या प्रश्नावर नेहमी पुढाकार घेणाऱ्या तृप्ती देसाई यांनी आता अलीकडच्या काळात पुरुषांवर होणारे अत्याचार, त्यांचा मानसिक छळ तसेच क्रूर हत्या पाहता पुरुषांच्या हक्कासाठी आता तृप्ती देसाई यांनी पुढाकार घेतला आहे.

तृप्ती देसाई यांनी यावेळी बोलताना राज्यातील महिलांच्या कर्तुत्ववार देखील भाष्य केले आहे. त्या म्हणाल्या, सध्या राज्यातील महिला अनेक कर्तुत्वाची कामे करत असल्याने राज्याच्या मुख्यमंत्री पदावर महिला विराजमान व्हावी. राज्यात मुख्यमंत्री बदलाची वेळ आली तर भाजपने महिलांना संधी द्यावी. पंकजा मुंडे या आक्रमक चेहरा असून त्यांना मुख्यमंत्री केल्यास आमची काहीच हरकत असणार नसल्याचेही तृप्ती देसाई म्हणाल्या.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०४ एप्रिल २०२५


## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा चिंचोलीस पुस्तकांचा संच भेट



**पडेगाव (शिवाजी गायकवाड)** : जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा चिंचोलीस जेष्ठ पत्रकार अर्थक्रांती प्रतिष्ठानचे विश्वस्त यमाजी मालकर, यांच्याकडून विविध वाचनीय पुस्तके सामाजिक कार्यकर्ते तथा महाराष्ट्र शासन गुणवंत पुरस्कार प्राप्त श्री नवनाथ बोडखे यांच्या हस्ते शाळेसाठी भेट देण्यात आले या वेळी इतिहास संशोधक डॉ शिवाजी गायकवाड, मुख्याध्यापक संजय वैष्णव शिक्षक, धनंजय भांबरे, रविकांत मुळे , सीमा कुलकर्णी, कारभारी वरकड व शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. दत्तात्रय फटांगडे यांना मराठी विषयात पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवी प्रदान



**पुणे** : पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, अनंतराव पवार महाविद्यालय पिरंगुट येथील प्राध्यापक व प्रसिद्ध कीर्तनकार डॉ. दत्तात्रय फटांगडे यांनी मराठी विषयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी (Ph.D.) संपादन केली आहे. "महाराष्ट्रातील वारकरी कीर्तन परंपरेचा अभ्यास " असा त्यांचा महत्त्वपूर्ण संशोधन विषय होता. डॉ. सीमा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आपले संशोधन कार्य पूर्ण केले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल अॅड. सचिन औटे, डॉ. तुकाराम रोंगटे मराठी विभागप्रमुख सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, प्राचार्य बी. जी. लोबो, सर्व सहकारी प्राध्यापक अनंतराव पवार महाविद्यालय पिरंगुट तसेच शिक्षण क्षेत्रातील सहकारी, मान्यवर, नातेवाईक व मित्रपरिवाराकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## अ. भा. मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या वाचन उपक्रमाचे पुरस्कार जाहीर

**छत्रपती संभाजीनगर** : येथील श्री सरस्वती भुवन प्रशालेचा विद्यार्थी चि. राहेश राहूल कुलकर्णी यास वाचनप्रेमी आणि कु.अंजली अपर्णा केणे हीस वाचनवीर पुरस्कार जाहीर झाला आहे. प्रशालेतील शिक्षक डॉ. विनोद सिनकर यांना ग्रंथदूत पुरस्कार जाहीर झाला आहे.

अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेतर्फे ऑगस्ट २०२४ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत माधव राजगुरू यांच्या संकल्पनेतून वाचन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपक्रमकाळात विद्यार्थ्यांनी विविध अभ्यासेतर पुस्तकांचे/ग्रंथांचे वाचन करून त्या-त्या पुस्तकांबद्दलचा अभिप्राय स्वहस्ताक्षरात दर महिन्याला नियमित लिहून पाठविले. त्यानुसार महाराष्ट्रातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांकडून दरमहा प्राप्त अभिप्रायांचे परीक्षण रविकांत आदरकर यांनी केले. त्यांत छत्रपती संभाजीनगर शहरातील पाच विद्यार्थ्यांना पुरस्कार जाहीर झाले. देसरडा पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी कु. श्रेया शरद नातू(वाचनभूषण),ओंकार विद्यालयाची विद्यार्थिनी गौतमी सखाराम आजगावकर(वाचनवीर) आणि शारदा मंदिर कन्या प्रशालेची विद्यार्थिनी निधी सुशील कांकरिया(वाचनभूषण) यांचाही समावेश आहे. वाचन चळवळीत सातत्याने सक्रीय राहून विविध उपक्रम राबवणारे बालसाहित्यिक शिक्षक डॉ. विनोद सिनकर यांना 'ग्रंथदूत' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या विद्यार्थी आणि शिक्षकांना पुणे येथे निमंत्रित करून मान्यवर लेखकांच्या हस्ते या पुरस्कारांचे समारंभपूर्वक वितरण करण्यात येणार आहे.सरस्वती भवन प्रशालेचे शालेय समिती अध्यक्ष ज्ञानप्रकाश मोदानी, मुख्याध्यापक विश्वरूप निकुंभ, उपमुख्याध्यापक राजेंद्र कोठावदे, पर्यवेक्षक अनिल देशमुख, सुनील महालपुरे आणि सर्व शिक्षकांनी या विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

## कवी, समीक्षक डी. बी. जगत्पुरिया यांच्या पत्नी सौ. विमला डी. जगत्पुरिया यांना भावपूर्ण श्रद्धांजली



**पडेगाव** : नामवंत कवी, लेखक,समीक्षक, ज्येष्ठ पत्रकार डी.बी.जगतपुरिया यांच्या पत्नी सौ. विमला डी. जगतपुरिया (74) यांचे आज दि.२ एप्रिल रोजी दीर्घ आजारामुळे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती डी.बी.जगतपुरिया, पंकज आणि धिरज ही मुले, सुना तसेच सौ. संगीता, सौ. अस्मिता या मुली, नातवंडे, पणतू असा मोठा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा रात्री 'संगर' मीरानगर पडेगाव येथून निघून पडेगाव समशानभूमीत अग्नीसंस्कार पार पडले. यावेळी शैक्षणिक साहित्यिक सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवर, डीपी जगतपुरिया यांचे धुळे व संभाजीनगर परिसरातील माजी विद्यार्थी, आप्तेष्ट मित्रपरिवार बहुसंख्येने उपस्थित होते. साहित्यिक ए.जे. त्रिभुवन,बालसाहित्यिक डॉ. विनोद सिनकर, मराठवाडा लेबर लॉ प्रॅ. असो. सचिव अभय टाकसाळ, सचिन गंडले AILU STATE COMMI MEMBER आदींनी विविध संस्था संघटनांमार्फत श्रद्धांजली वाहिली.

## एकही कर्करोग संशयित महिला उपचारापासून वंचित राहता कामा नये : मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांच्या सूचना

**हिंगोली** : जिल्ह्यात महिलांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या संजीवनी उपक्रमात एकही कर्करोगग्रस्त संशयित महिला औषधोपचारापासून वंचित राहणार नाही याची दक्षता आरोग्य विभागाने घ्यावी अशा सूचना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी गुरुवारी ता 3 दिल्या आहेत.

सेनगाव तालुक्यातील गोरेगाव येथे कर्करोगग्रस्त संशयित महिलांच्या तपासणी शिबिराच्या वेळी त्या बोलत होत्या. यावेळी आमदार तानाजी मुटकुळे,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कैलास शेळके, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ नितीन तडस, डॉ मंगेश टेहरे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सतीश रुणवाल, डॉ. वसंत पाटील, डॉ. कुणाल अवचट यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश म्हणाले की महिलांचे आरोग्य चांगले असेल तर संपूर्ण कुटुंबाचे आरोग्य चांगले राहाते. मात्र महिला त्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करीत असल्याची दिसून येते ही बाब त्यांच्या कुटुंबासाठी निश्चितच योग्य नाही. अनेक वेळा मोठ्या आजाराने ग्रस्त झाल्यानंतर उपचारासाठी धावपळ केली जाते. यामध्ये मानसिक त्रासासोबतच आर्थिक त्रास देखील सहन करावा लागतो. त्यामुळे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी संजीवनी ही संकल्पना हाती घेतली. या उपक्रमात अशा कर्मचाऱ्यांमार्फत गाव पातळीवर प्रत्येक महिलांशी संवाद साधून त्यांची आरोग्य विषयक माहिती नोंदवण्यात आली. या उपक्रमात अशा कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट काम केल्याबद्दल त्यांनी आशा कर्मचाऱ्यांचे कौतुकही केले.

जिल्ह्यामध्ये आढळून आलेल्या संशयित कर्करोगग्रस्त महिलांची प्राथमिक आरोग्य केंद्र प्राथमिक आरोग्य उपकेंद्र स्तरावर आवश्यक तपासणी करावी. या तपासणीमध्ये कर्करोग्रस्त महिला आढळून आल्यास त्यांना तातडीने संदर्भसेवा द्यावी. त्यांचे औषधोपचार व शस्त्रक्रिया मोफत होतील तसेच एकही महिला उपचारापासून वंचित राहणार नाही याचे नियोजन आरोग्य विभागाने करावे अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. इतर तालुक्यांमध्ये ही या तपासण्या तातडीने सुरू करण्याच्या सूचनाही त्यांनी आरोग्य विभागाला दिल्या आहेत. महिलांनीही लहान मोठे आजार अंगावर न काढता तातडीने औषध उपचार घ्यावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळीआमदार तानाजी मुटकुळे यांनी मार्गदर्शन केले. संजीवनी उपक्रमात शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांसोबतच खाजगी स्त्री रोग तज्ञांची मदत घेऊन हा उपक्रम जिल्ह्यामध्ये यशस्वीपणे राबवावा असे आवाहन त्यांनी केले. त्यासाठी लागणारे आवश्यक सहकार्य करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर सतीश रुणवाल यांनी केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०४ एप्रिल २०२५


## राज्यस्तरीय 'मिलिंद मॅरेथॉन २०२५' चे भव्य आयोजन मॅरेथॉनमध्ये धावणार हजारो विद्यार्थी व नागरिक



**छत्रपती संभाजीनगर :** बोधीसत्व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या पीपल्स् एज्युकेशन सोसायटी मुंबईच्या छत्रपती संभाजीनगर येथील मिलिंद महाविद्यालयाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी रविवारी दि. १३/०४/२०२५ रोजी होणाऱ्या 'मिलिंद मॅरेथॉन २०२५' ची तयारी पूर्ण झाली असुन हजारो नागरिक शहरातील रस्त्यावरुन मॅरेथॉनमध्ये सहभागी होऊन धावणार आहेत.मिलिंद मॅरेथॉन २०२५ 'रन फॉर मिलिंद' हे ब्रिद वाक्य घेऊन या मिलिंद मॅरेथॉनमध्ये मुख्यत्वे ७ कि.मी. रनसाठी पुरुष व महिलासाठी पहिले पारितोषिक रु. १०,०००/- व ट्रॉफी तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोचा २४ कॅरेट गोल्ड प्लेटेड टि-शर्ट, द्वितीय पारितोषिक रु. ८,०००/- व ट्रॉफी तर तृतीय पारितोषिक रु. ६,०००/- व ट्रॉफी ठेवण्यात आले आहे. ५ कि.मी. रनसाठी पुरुष व महिला पहिले पारितोषिक रु. ८,०००/- व ट्रॉफी, द्वितीय पारितोषिक रु. ६,०००/- व ट्रॉफी तर तृतीय पारितोषिक रु. ४,०००/- व ट्रॉफी ठेवण्यात आले आहे, तर ३ कि.मी. रनसाठी पुरुष व महिला पहिले पारितोषिक रु.६,०००/- व ट्रॉफी, द्वितीय पारितोषिक रु.४,०००/- व ट्रॉफी तर तृतीय पारितोषिक रु.२,०००/- व ट्रॉफी ठेवण्यात आले आहे, तर जेष्ठ नागरिकांसाठी रन फॉर फन चे ही आयोजन करण्यात आले आहे.मिलिंद मॅरेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व स्पर्धकांनी सकाळी ठिक ५.०० वाजता मिलिंद महाविद्यालयाच्या प्रांगणात आपल्या टि-शर्ट व बीब नंबर परीधान करुन उपस्थिती नोंदविणे आवश्यक आहे. पहिली स्पर्धा सकाळी ६.०० वाजता ७ कि.मी. साठी सुरु होईल, दुसरी स्पर्धा सकाळी ६.१५ वाजता ५ कि.मी. साठी सुरु होईल व तिसरी स्पर्धा सकाळी ६.३० वाजता ३ कि.मी. साठी सुरु होईल तसेच यामध्ये रन फॉर फन सकाळी ७.०० वाजता सुरु होईल.मिलिंद मॅरेथॉनच्या यशस्वी आयोजनासाठी शहरातील विविध सेवाभावी संस्थांनी प्रायोजक म्हणून सहभागी होण्यासाठी संमती दिलेली असून मॅरेथॉन मधील बक्षिसांची रक्कम मा. सचिव, मा. प्राचार्य एस.टी.प्रधान फाऊंडेशन, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून देण्याचे मान्य केले आहे. करीता मोठया संख्येने विद्यार्थी, युवक, खेळाडू व विविध क्षेत्रातील नागरिकांनी उपस्थित राहुन मिलिंद मॅरेथॉनमध्ये सहभागी व्हावे. असे आवाहन मिलिंद मॅरेथॉनच्या मुख्य संयोजक व प्राचार्या डॉ. वैशाली प्रधान यांनी केले आहे.

## पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला जीवापेक्षा पैसा महत्त्वाचा




**पुणे :** पुण्यातील दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल प्रशासनाला रुग्णापेक्षा पैसा महत्त्वाचा झाला आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे. येथील प्रशासनाच्या मुजोरपणामुळे एका गर्भवती महिलेला आपला जीव गमवावा लागला आहे. दोन गोंडस जुळ्या मुलांना जन्म देऊन या आईचा मृत्यू झाला आहे. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. तसेच नामांकित अशा दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर प्रश्न उपस्थित होत आहेत.

समोर आलेल्या माहितीनुसार, तनिषा भिसे यांना प्रसुतीच्या वेदना सुरू झाल्यावर तातडीने दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारासाठी रुग्णालय प्रशासनाने दहा लाख रुपयांची मागणी केली. इतके पैसे कसे आणायचे असा प्रश्न गर्भवती महिलेच्या कुटुंबीयांना पडला. तेव्हा जवळ सध्या दोन लाख रुपये आहेत, तेवढे घेऊन उपचार सुरू करण्याची विनंती कुटुंबीयांनी केली. मात्र तरी देखील महिलेला प्रसुतीसाठी दाखल करून घेतले नाही. त्यानंतर गर्भवती महिलेला दुसऱ्या रुग्णालयात नेण्याचा निर्णय कुटुंबीयांनी घेतला.

गर्भवती महिलेला दुसऱ्या रुग्णालयात नेत असताना महिलेला त्रास झाला आणि दोन जुळ्या मुलांना जन्म देऊन महिलेने श्वास सोडला. या घटनेने भिसे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. तसेच दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या प्रशासनाच्या मुजोरपणामुळे या महिलेला जीव गमवावा लागला, असा आरोप केला जात आहे. या घटनेने पुण्यात एकच खळबळ उडाली आहे. तसेच या रुग्णालयाला जीवापेक्षा पैसा महत्त्वाचा झाला आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे. या प्रकरणी आम्ही रुग्णालयाशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला, मात्र संपर्क होऊ शकला नाही.

दरम्यान, मृत महिलेचे पती सुशांत भिसे हे भाजप आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहाय्यक आहेत. रुग्णालयाच्या प्रशासनाच्या मुजोर कारभाराची माहिती सुशांत भिसे यांनी कळवली असता तेव्हा मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातून रामेश्वर नाईक यांनी फोन केला. तरी देखील रुग्णालय प्रशासनाने त्यांचे ऐकले नाही. याचा परिणाम म्हणजे गर्भवती महिलेला आपला जीव गमवावा लागला. या घटनेची आमदार अमित गोरखे यांनी मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केली असल्याचे समजते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103


## स्वारगेट बलात्कार प्रकरणात नवा ट्विस्ट : कोर्टाने पोलिसांना कोठडी देण्याची मागणी दुसऱ्यांदा फेटाळली

**पुणे :** स्वारगेट बस स्थानकात शिवशाही बस मध्ये २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार करण्यात आल्याचा प्रकार २५ फेब्रुवारी रोजी पहाटे सहा वाजण्याचे सुमारास घडला होता. याप्रकरणात आरोपी दत्तात्रय गाडे (वय- ३७,रा.गुनाट,शिरुर,पुणे) यास पोलिसांनी अटक देखील केली. सुरवातीलाच गाडे यास एकुण १४ दिवसांपैकी १२ दिवस पोलिस कोठडी मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी त्याचा उर्वरित कोठडीचा अधिकार राखून ठेवत त्यास न्यायालयीन कोठडी मिळावी असे न्यायालयात सांगितले होते. या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांना आरोपीबाबत आणखी नवीन माहिती मिळाली असून त्याकरिता त्याला किमान एक दिवसाची कोठडी मिळावी, अशी मागणी गुरवारी न्यायालयात केली. परंतु प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी टी. एस. गायगोले यांनी आरोपीची दुसऱ्यांदा पोलिस कोठडी मिळण्याचा अर्ज फेटाळून लावला.

पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी याप्रकरणात आरोपीला अटक केल्यानंतर १५ दिवसात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात येईल असे जाहीर केले होते. परंतु अद्याप याबाबत दोषारोपपत्र दाखल करण्यात आले नाही. दोषारोपपत्र दाखल करण्याचे दृष्टीने तपास पथक कागदपत्रांची जुळवाजुळव करत आहे. तपासात आणखी काही महत्वपूर्ण बाबींची चौकशी करावी लागणार आहे. त्यादृष्टीने आरोपीची उर्वरित दोन दिवसांची पोलिस कोठडी मिळावी असा अर्ज दोन एप्रिल रोजी पुणे पोलिसांनी न्यायालयात सादर केला होता. परंतु आरोपीला २८ फेब्रुवारी रोजी पोलिसांनी अटक केल्यानंतर, न्यायालयात हजर केल्यावर त्यास १२ दिवसांची पोलिस कोठडी दिली होती. सदरची वेळ ही पुरेशी असून आरोपीला पुन्हा ताब्यात घेण्याकरिता पोलिसांनी दिलेली कारणे योग्य नसल्याचे सांगत न्यायालयाने पोलिसांचा अर्ज फेटाळून लावला होता. त्यानंतर पुन्हा तीन मार्च रोजी पोलिसांनी न्यायालयात अर्ज दाखल करुन, आरोपीकडे चौकशी करण्यासाठी किमान एक दिवसांची पोलिस कोठडी मिळावी अशी मागणी केली होती. मात्र, पुन्हा न्यायालयाने त्यांची मागणी फेटाळून लावली आहे. बचाव पक्षाच्यावतीने अ‍ॅड.वाजेद खान बीडकर यांनी न्यायालयात युक्तिवाद केला. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस निरीक्षक शैलेश संख्ये करत आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०४ एप्रिल २०२५


## मोहम्मद अली जिन्नांचा आत्मा तुमच्यात बसलाय - संजय राऊतांचा सरकारवर हल्लाबोल



**मुंबई :** मोहम्मद अली जिन्नांचा **मुंबई :** आत्मा उठून तुमच्यात बसला आहे का? असे म्हणत शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी राज्यसभेत सत्ताधारी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. राज्यसभेत वक्फ विधेयकावर चर्चा सुरू असताना संजय राऊत यांनी भाजपवर जोरदार टीका केली. त्यांच्या टीकेनंतर सभागृहात गोंधळ उडाला होता.

राज्यसभेत वक्फ विधेयकावर चर्चा सुरू असताना संजय राऊत म्हणाले, तुम्ही खुश दिसत आहात. पण मुसलमानांची इतकी काळजी तर पाकिस्तानच्या मोहम्मद अली जिन्नांनाही नव्हती. जिन्नांचा आत्मा उठून तुमच्यात बसला आहे का? असा सवाल संजय राऊत यांनी विचारला तेव्हा सभागृहात एकच गोंधळ निर्माण झाला होता. पुढे बोलताना संजय राऊत म्हणाले, सत्ताधाऱ्यांनी हिंदुत्वाचा नारा दिला असला तरी आता तेच वक्फ बोर्डासंदर्भात मुसलमानांसाठी विशेष काळजी घेत आहेत.

पुढे बोलताना संजय राऊत म्हणाले, मला वाटायचे आम्ही हिंदूराष्ट्र बनवणार आहोत, पण आता गरीब मुसलमानांची काळजी घेण्याचा नवा अजेंडा सुरू आहे. एकेकाळी तुम्ही मंगळसूत्र, गाय-बैल मुसलमानांकडे जातील म्हणून आक्षेप घेत होतात, आता मात्र तुम्ही स्वतःच हिंदुत्वाचे नवीन मुल्ला बनले आहात, अशी जोरदार टीका संजय राऊत यांनी केली.

संजय राऊत यांनी पुढे बोलताना अयोध्येतील जमीन घोटाळ्यावर निशाणा साधला आहे. ते म्हणाले, अयोध्येत जमीन घोटाळा झाला आहे. हिंदूंच्या जमिनीची रक्षा करता येत नसेल, तर मुसलमानांची काय करणार? तुमच्या सरकारला जमीन विक्रीच करायची आहे. पुढे बोलताना संजय राऊत म्हणाले, काश्मीर पंडितांना अद्याप जमीन आणि घरे मिळालेली नाहीत, त्यांची तुम्हाला काहीही चिंता नाही. पण जमिनीचा वापर करण्यासाठी तुम्ही विशेष धोरण राबवत आहात.

दरम्यान, शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी देखील या विधेयकावर टीका केली आहे. सुधारणा विधेयकमध्ये काही मुद्दे चांगले आहेत. वक्फ बोर्ड जमिनी तुम्ही ताब्यात घेणार असं म्हणताय, म्हणजे त्यांच्या जमिनीवर यांचा डोळा आहे. जिन्नांना लाजवेल अशी मुस्लिमांची बाजू घेणारी भाषण अमित शाह यांच्यासह त्यांच्या मित्र पक्षाच्या नेत्यांनी केली. जे तुम्ही म्हणताय आम्ही हिंदुत्व सोडलं, ते गद्दार मुस्लिमांची स्तुती करत होते. तेव्हा तुम्ही शांत का बसले? कुठे गेले बाळासाहेब ठाकरे यांचे विचार? असा सवालही उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत उपस्थित केला होता.

## वक्फ विधेयक हे मुस्लिमांच्या हिताचे नाही - अबू आझमी

**मुंबई :** इरादे खंजर के तो नेक नहीं हो सकते, असे म्हणत समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी केंद्र सरकारच्या वक्फ दुरुस्ती विधेयकावर तसेच केंद्र सरकारवर टीका केली आहे. बुधवारी रात्री उशिरा वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर झाले आहे. त्यानंतर विरोधकांनी केंद्र सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. यावर आमदार अबू आझमी यांनी प्रतिक्रिया देत सरकारवर टीका केली आहे.

पत्रकारांशी बोलताना अबू आझमी म्हणाले, इरादे खंजर के नेक नहीं हो सकते. ज्या लोकांनी सरकार आल्यानंतर सुद्धा मुस्लिमांच्या हिताचे एकही काम नाही केले मुस्लिमांच्या मशिदींच्या खाली मंदिर शोधत आहेत. मंदिर भरल्यानंतर बाहेर प्रार्थना करण्यासाठी लोक उभे राहू शकतात. पण मशिदी भरल्यानंतर मुस्लिम लोक बाहेर नमाज नाही अदा करू शकत. जर तसे केले तर परवाना रद्द केले जात आहे. हे लोक जे विधेयक आणत आहेत ते मुस्लिमांच्या हिताचे असूच शकत नाही, असे अबू आझमी म्हणाले.

पुढे बोलताना अबू आझमी म्हणाले, त्यांना आमच्या या जमिनी बळकावयाच्या आहेत. आमच्या पूर्वजांनी ज्या जमिनी मशिदींसाठी, स्मशानभूमीसाठी जे वक्फ घेतले होते त्यावर यांचा डोळा आहे. हे लोक मुस्लिमांच्या हिताचे कधीच काम करू शकत नाहीत. आजपर्यंत त्यांनी जे काही काम केले आहे ते सगळे मुस्लिमांच्या विरोधात केले आहे, असा आरोपही अबू आझमी यांनी केला आहे.

अबू आझमी म्हणाले, या देशाला हिंदू राष्ट्र बनवण्यासाठी यांचे हे पाऊल पडत आहे ते मुस्लिमांवर अन्याय केला जात आहे. राज्यसभेत देखील हे विधेयक मंजूर होणार आहे कारण त्यांच्याकडे बहुमत आहे. मी पक्षातील वरिष्ठांशी बोलून पुढील भूमिका ठरवणार आहे. देशात देखील यांचे बहुमत आहे, त्याच आधारे तर बाबरी मशिदीत मंदिर बनवण्यात आले आहे. मात्र, आम्ही या विधेयकाचा विरोध करणार आणि करत राहणार, असे अबू आझमी म्हणाले.


दरम्यान, शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी देखील या विधेयकावर टीका केली आहे. सुधारणा विधेयकमध्ये काही मुद्दे चांगले आहेत. वक्फ बोर्ड जमिनी तुम्ही ताब्यात घेणार असं म्हणताय, म्हणजे त्यांच्या जमिनीवर यांचा डोळा आहे. जिन्नांना लाजवेल अशी मुस्लिमांची बाजू घेणारी भाषण अमित शाह यांच्यासह त्यांच्या मित्र पक्षाच्या नेत्यांनी केली. जे तुम्ही म्हणताय आम्ही हिंदुत्व सोडलं, ते गद्दार मुस्लिमांची स्तुती करत होते. तेव्हा तुम्ही शांत का बसले? कुठे गेले बाळासाहेब ठाकरे यांचे विचार? असा सवालही उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत उपस्थित केला होता.




भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेते राजेशजी मुंढे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध ठिकाणी अनेक उपक्रम राबविण्यात आले. याप्रसंगी त्यांचा सत्कार करताना उद्योगपती राजेश उघडे पाटील, सामाजिक कार्यकर्ते अच्युत मामा कुलकर्णी, बाळूभाऊ गजहंस, सुप्रसिद्ध निवेदक महेश अचिंतलवार, उमेश संभेराव कैलास घाडगे पाटील, दै. महाराष्ट्र जनशक्तीचे मुख्य संपादक प्राचार्य डॉ. हसन इनामदार आदी दिसत आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०४ एप्रिल २०२५


## आरती अधाने यांनी राष्ट्रीय जुडो स्पर्धेत पटकावला तृतीय क्रमांक - ग्रामीण भागातून जागतिक स्तराकडे वाटचाल



**पडेगाव (शिवाजी गायकवाड)** : उत्तराखंड, देहरादून ग्रामीण भागातील संघर्षातून आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घेणाऱ्या खेळाडूंची नावे सातत्याने पुढे येत आहेत. याच यादीत आरती रामनाथ अधाने हिच्या नावाची भर पडली आहे. नुकत्याच पार पडलेल्या ज्युनियर नॅशनल जुडो स्पर्धेत ७० किलो वजनी गटात आरतीने तृतीय क्रमांक पटकावत ब्राँझ मेडल मिळवले आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.संघर्षातून खेळापर्यंतचा प्रवासग्रामीण भागात शेती व दुग्धव्यवसाय सांभाळत क्रीडा क्षेत्रात मोठी कामगिरी करण्याचा निर्धार आरतीने केला होता. वडिलांसोबत शेतीपूरक व्यवसाय करताना तिने कठोर मेहनतीच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर यश संपादन केले. तिच्या यशामुळे संपूर्ण गावामध्ये आनंदाचे वातावरण आहे.प्रशिक्षण व मार्गदर्शनआरतीने जुडो खेळाचे प्राथमिक शिक्षण स्वर्गीय वस्ताद सज्जनसिंग जारवाल सर यांच्याकडून घेतले. सध्या ती गोपाल बमवात आणि बिलवाल सर यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक प्रशिक्षण घेत आहे. तिच्या मेहनतीला प्रशिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि कुटुंबाचा पाठिंबा लाभला आहे.आरतीने इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा गदाना येथे शिक्षण घेतले असून, आठवी ते बारावी न्यू हायस्कूल गदाना या संस्थेमध्ये शिक्षण पूर्ण केले आहे.कुस्तीचा वारसा आणि वडिलांचे योगदान आरतीच्या वडिलांना रामनाथ अधाने यांना लहानपणापासून कुस्तीचा शौक होता. मात्र, सातवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना शेती आणि कुटुंबाची जबाबदारी घ्यावी लागली. तरीही कुस्तीवरील प्रेम कायम राहिले आणि त्यांनी मुलींनाही या क्षेत्रात पुढे नेण्याचा निर्धार केला. आपल्या मेहनतीने त्यांनी आपल्या मुलींना कुस्तीमध्ये नाविन्यपूर्ण प्रशिक्षण दिले, ज्याचे फळ त्यांना आता मिळत आहे.गावकऱ्यांचा सत्कार आणि अभिनंदनाचा वर्षावआरतीच्या या यशानंतर तिने शिक्षण घेतलेल्या शाळेतील विद्यार्थी, शिक्षक आणि गावकऱ्यांनी तिचा भव्य सत्कार केला. गावातील नागरिकांनी तिच्या मेहनतीचे कौतुक करत तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. आंतरराष्ट्रीय स्तराकडे वाटचालराष्ट्रीय स्तरावर यश मिळवल्यानंतर आरती आता आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी सज्ज होत आहे. तिच्या आगामी स्पर्धांसाठी गावकऱ्यांनी आणि चाहत्यांनी तिला शुभेच्छा दिल्या आहेत. खेळाडूंसाठी प्रेरणादायी उदाहरणआरती अधाने हिच्या यशामुळे ग्रामीण भागातील युवक आणि विद्यार्थ्यांना मोठी प्रेरणा मिळाली आहे. शेती, व्यवसाय आणि खेळ याचा सुरेख समन्वय साधत मोठ्या यशाची शिखरं गाठता येतात, हे आरतीने आपल्या कर्तृत्वाने सिद्ध केले आहे.आरती अधाने हिला पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा..!

## ग्रामपंचायत कार्यालय शरणापुर येथे कन्या दिन उत्साहात साजरा



**शरणापूर (शिवाजी गायकवाड)** : रोजी ग्रामपंचायत कार्यालय शरणापुर येथे कन्या उत्साहात साजरा करण्यात आला होता. यावेळी शरणापूर गावच्या सरपंच सौ संध्या संदीप आप्पा सदावर्ते ग्रामपंचायत अधिकारी सारंगधर लोढे तसेच आरोग्य सेवक दांडगे साहेब ग्रामपंचायत लिपिक आर के साठे ग्रामपंचायत शिपाई ज्ञानेश्वर कान्हेरे ग्रामपंचायत केंद्रचालक आर के कान्हेरे आशा सेविका अंगणवाडी सेविका तसेच गावातील महिला या कन्या दिवसाच्या कार्यक्रमाला उपस्थित होते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## ग्रामपंचायत औराळी येथे कन्या दिन साजरा



**औराळा (अक्षय चव्हाण)** : प्राथमिक केंद्र औराळा अंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत औराळी येथे कन्या दिन साजरा करण्यात आला या निमित्ताने नागरिकांना कन्या दिनाचे महत्त्व, स्त्रीभ्रूण हत्या, पी सी पी एन डी कायदा या विषयी सांगण्यात आले. यावेळी गावाचे सरपंच साहेब, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रतीक्षा राजपूत मॅडम, ग्रामसेवक, आशा ताई गटप्रवर्तक,अंगणवाडी कार्यकर्त्या, श्रीमती गुळवे परिचारिका हे सर्व उपस्थित होते...!

## गदाना गावाचे सरपंच यांची प्रतिक्रिया





**गदाना (शिवाजी गायकवाड)** :"गदाना गावातील कन्या आरती रामनाथ अधाने हिने राष्ट्रीय जुडो स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवत गावाचे नाव उज्ज्वल केले, याचा संपूर्ण गावाला अभिमान वाटतो. तिच्या कठोर परिश्रमाने आणि जिद्दीने तिने हे यश संपादन केले आहे.आरतीने इथल्या जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शिक्षण घेतले आणि त्यानंतरही खेळ आणि शिक्षण यांचा समतोल राखत पुढे वाटचाल केली. तिच्या या यशामुळे गावातील इतर विद्यार्थ्यांना मोठी प्रेरणा मिळेल.गावच्या वतीने तिचे मनःपूर्वक अभिनंदन करत असून, ती आंतरराष्ट्रीय स्तरावरही यशस्वी व्हावी, अशी शुभेच्छा देतो."

## पुण्यात दोन वेगळ्या अपघातांत दोघांचा मृत्यू

**पुणे** : उंड्री परिसरात सकाळी मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडलेल्या एका नागरिकाचा भरधाव कारने धडक दिल्याने जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. अपघातानंतर पसार झालेल्या कारचालकाविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला. त्यानंतर त्याचा शोध घेऊन त्यास अटक करण्यात आली आहे.

सुजीतकुमार सिंह (वय 49, रा. उंड्री, पुणे) असे मयत झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुजीतकुमार सिंह नियमितपणे सकाळी फिरायला जातात. सोमवारी सकाळी ते नेहमीप्रमाणे फिरायला बाहेर पडले. उंड्रीतील न्याती सोसायटीसमोर भरधाव कारने सुजीतकुमार यांना जोरात धडक दिली. अपघातानंतर घटनास्थळी न थांबता कारचालक पसार झाला. पसार झालेल्या कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याचा शोध घेऊन जेरबंद करण्यात आले आहे.

दुसरीकडे, याच परिसरातील बाह्यवळण रस्त्यावर भरधाव दुचाकी घसरून सहप्रवासी तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी दुचाकीस्वाराविरुद्ध वारजे माळवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०४ एप्रिल २०२५

# उद्धव ठाकरे म्हणजे UT अर्थात 'युज अँड थ्रो' एकनाथ शिंदे



**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी वक्फ सुधारणा विधेयकावरून उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे कालचे कृत्य बाळासाहेबांचे विचार अजूनही ज्यांच्या मनात आहेत, त्यांना मान खाली घालायला लावण्यासारखे होते. काय बोलायचे? काय निर्णय घ्यायचा? व काय करायचे? हे सूचत नसलेले उबाठा नेतृत्व या निमित्ताने महाराष्ट्राला दिसले, असे ते म्हणाले. उद्धव ठाकरे म्हणजे UT अर्थात 'यूझ अँड थ्रो', असा पलटवारही त्यांनी यावेळी ठाकरेंच्या 'एसंशिं' टीकेला प्रत्युत्तर देताना केला.

लोकसभेने बुधवारी मध्यरात्री २ वा. वक्फ सुधारणा विधेयकावर आपली मोहोर उमटवली. यावेळी झालेल्या मतदानात ठाकरे गटाने या विधेयकाविरोधात भूमिका घेतली. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी एका पत्रकार परिषदेद्वारे आपली भूमिका स्पष्ट केली. त्यात त्यांनी केंद्राने वक्फ विधेयक जमिनींवर डोळा ठेवून आणल्याचा आरोप केला. त्यांच्या या टीकेवर बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे यांचे विचार अजूनही ज्यांच्या मनात आहेत त्यांना मान खाली घालवण्यासारखे कृत्य काल झाले. त्यांच्या लोकप्रतिनिधींनीही खंत व्यक्त केली.

कालचा दिवस हा खऱ्या अर्थाने उबाठासाठी अत्यंत दुर्दैवी होता. त्यांनी वक्फ बोर्ड बिल व हिंदुत्वाचा काही संबंध नसल्याचा दावा केला. आमचा वक्फ बिलाला नव्हे तर भाजपच्या ढोंगीपणाला विरोध असल्याचे ते म्हणाले. त्यामुळे ते अतिशय गोंधळलेल्या स्थितीत सापडल्याचे स्पष्ट होते. काय बोलायचे, काय निर्णय घ्यायचा, काय करायचे हे सूचत नसलेले उबाठा नेतृत्व काल दिसले.

उद्धव ठाकरेंची स्थिती धरले की चावतंय आणि सोडलं की पळतंय अशी झाली आहे. बाळासाहेबांचा राष्ट्रभक्त मुस्लिमांना पाठिंबा होता. तीच भूमिका शिवसेनेची आहे. हीच भूमिका भाजप व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही आहे. जो मुस्लिम देशभक्त व राष्ट्रभक्त आहे, ज्याचे या देशावर प्रेम आहे, त्याला आमचा पाठिंबा आहे. पण देशविरोधी कृत्य करणाऱ्यांना, मग ते कुणीही असले तरी आमचा त्यांना विरोध आहे. ही भूमिका घेऊन बाळासाहेब अखंडपणे घेऊन चालले. तीच भूमिका या वक्फ बोर्डाच्या माध्यमातून भाजपने दाखवली.

परंतु, सातत्याने राहुल गांधी यांची सावली मिळाल्यामुळे, त्यांच्या सोबत राहिल्यामुळे उबाठाला सातत्याने व वारंवार मोहम्मद अली जिना यांची आठवण येत आहे. हे दुर्दैव आहे. त्यामुळे मी आपल्याला एवढेच सांगतो की, आता त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. काय करायचे हे त्यांना सुधरत नाही. काय निर्णय घ्यायचे ते समजत नाही. त्यातून त्यांच्यावर आज आपल्या निर्णयाचे समर्थन करण्यासाठी पत्रकार परिषद घेण्याची वेळ आली. त्यातून त्यांनी स्वतःचीच अब्रू काढून घेतली, असे शिंदे म्हणाले.

एकनाथ शिंदे पुढे म्हणाले, वक्फ बोर्डामुळे काही मूठभर लोकांच्या हातात लाखो, कोट्यवधी एकर जमीन अडकली होती. नव्या विधेयकामुळे त्याला चाप बसेल. काँग्रेसच्या काळात वक्फ बोर्डाच्या १२३ जागा डिनोटीफाईड करण्यात आल्या होत्या. त्या काही निवडक लोकांच्या घशात घातल्या गेल्या. आता असे कोणतेही कृत्य करता येणार नाही. पंतप्रधान मोदींच्या वक्फ बोर्डाच्या विधेयकामुळे अशा लोकांना चाप बसेल. वक्फच्या प्रॉपर्टीवर शाळा, हॉस्पिटल आदी सुविधा तयार होतील. महिला, मुलांना मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळेल. त्यामुळे मुस्लिमांनीही त्याचे स्वागत केले आहे.

उद्धव ठाकरे यांनी भाजपवर या विधेयकावर मुस्लिमांचे लांगुलचालन केल्याचा आरोप केला. एकीकडे ते भाजपवर मुस्लिमांच्या बाजूने बोलण्याचा आरोप करतात, दुसरीकडे त्यांचे लांगुलचालन करण्याचाही आरोप करतात. त्यांना नेमके काय म्हणायचे आहे? एखादे नेतृत्व गोंधळलेल्या स्थितीत सापडले असेल तर त्या पक्षाचा इतिहास संपुष्टात येतो. त्यामुळे त्यांच्यावर ओढावलेली परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्र पाहत आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

उद्धव ठाकरे गत काही दिवसांपासून एकनाथ शिंदे यांचा उल्लेख 'एसंशिं' असा करत आहेत. पत्रकारांनी याविषयी शिंदे यांना छेडले असता त्यांनी उद्धव ठाकरे यांचा उल्लेख यूटी अर्थात युज अँड थ्रो असा केला. वापरो और फेको ही त्यांची नीती आहे. मला बोलायला लावू नका. माझ्याकडे भरपूर काही आहे. मी शांत आहे. मला शांतपणे काम करू द्या. तुम्ही माझी गद्दार व खोके - खोके म्हणून हेटाळणी केली. अरे तुम्हाला महाराष्ट्रातील जनतेने खोक्यामध्ये बंद करू टाकले. १०० मधून वीसच आले, ते ही आमच्या लोकांच्या काही चुका झाल्यामुळे... आम्ही ८० लढवल्या आणि ६० जागा जिंकल्या. महाराष्ट्रातील जनतेने विधानसभा निवडणुकीत गद्दार कोण व खुद्दार कोण हे स्पष्ट केले, असेही एकनाथ शिंदे यावेळी बोलताना म्हणाले.

# वक्फ बोर्ड विधेयकावरून विरोधकांचा सरकारवर हल्लाबोल

**मुंबई :** देशाच्या संसद भवनात वक्फ बोर्ड विधेयकावर चर्चा सुरू असून केंद्र सरकार व विरोधकांमध्ये चांगलेच मतभेद सुरू असल्याचे दिसत आहे. याचे पडसाद महाराष्ट्राच्या राजकारणातही दिसून येत आहेत. राज्यात महायुती आणि महाविकास आघाडीमधील नेतेही आमने सामने आल्याचे दिसत आहेत. त्यात आता राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी देखील या प्रकरणी आपली प्रतिक्रिया दिली आहे. अंबानी यांचे घर वक्फ बोर्डाच्या जमिनीवर असून मुस्लिम समाजातील काही नेत्यांनी कायद्याचा दुरुपयोग केल्याचा दावा जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना जितेंद्र आव्हाड म्हणाले, माझा सरकारला सवाल आहे की, हिंदू मंदिरात अब्जो रुपयांचे सोने आहे, आता हे सोने तुम्ही ताब्यात घेणार का? मला सरकारने याचे उत्तर द्यावे. लोकांच्या धार्मिक विषयात जायची काय गरज आहे. संविधानाचे उल्लंघन करण्याचे काम सुरू आहे. आता आपल्याकडे दक्षिणेतील मंदिराकडे भारताला श्रीमंत करतील असे दुप्पट सोने आहे. मग, आपण वक्फ बोर्डला विरोध कशाला करायचा? एकदा जमीन वक्फ करण्यात आली म्हणजेच समाजासाठी दान करण्यात आली, परत ती हस्तांतरित करण्यात येणार नाही.

जितेंद्र आव्हाड म्हणाले, आता कायदा करायचा असेल तर असा करा की या जमिनीकडे कोणी वाकड्या नजरेने पाहणार नाही, त्यांच्या वाड वडिलांनी वक्फला दान केलेल्या जमिनी आहेत, असेही आव्हाड यांनी म्हटले. अंबानींचे घर हे वक्फच्या जमिनीवर आहे, मुस्लिम समाजातील काही नेत्यांनी कायद्याचा दुरुपयोग केला. आता दिल्लीच्या मध्यवर्ती भागातील जमिनी देखील मोकळ्या बाजारात येणार आहेत, असा दावाही जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

किरण रिजीजू यांनी संसद वक्फच्या जागेवर असल्याचे विधान केले होते. यावर बोलताना जितेंद्र आव्हाड म्हणाले, त्यांच्या विधानावर मी हसेल. कारण ते म्हणतात संसद संसद वक्फच्या जागेवर आहे. अरे इंग्रजांच्या काळापासून संसद त्याठिकाणी आहे. उगाच चुकीची माहिती पसरवू नका. किरण रिजीजूसारखा माणूस म्हणतो की उद्या हे संसदेच्या जमिनीवर हक्क सांगतील. किरण रिजीजू आम्ही काय वेडे आहेत का? सरकारचा एक जबाबदार मंत्री सभागृहात ऑन रेकॉर्ड चुकीचे वक्तव्य करतो आणि हे वक्तव्य जगभर जात आहे. आता यावर काय बोलायचे? असा सवालही जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केला.

# ईदच्या रात्री नमाजीवर जीवघेणा हल्ला



**पुणे :** रमजान ईदच्या दिवशी रात्री नमाज पठाण करून घरी निघालेल्या एकाला रस्त्यात आडवून चाकुने पोटात भोकसून खुनाचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी सलिम शेख आणि अमिर शेख (दोघेही रा. मार्कडेयनगर, वैदवाडी हडपसर ) या आरोपीच्यावर वानवडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आवेज फिरोज शेख (२३, रा. मार्कडेयनगर, वैद्यावाडी, हडपसर) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ३१ मार्च रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी वैदवाडी येथील अंजुमन तालीमुन मशीद येथून नमाज पठण करून वैद्यवाडी येथील भिम साम्राज्य प्रतिष्ठान येथून चालले होते. त्या ठिकाणी फिर्यादी यांना गर्दी झालेली दिसली. गर्दीतून फिर्यादीने वाट काढून पाहिले असता तक्रारदार यांचे मामा सलजीम अमिन सय्यद यांना त्यांच्याच वस्तीत राहणारा सलीम शेख व त्याचा मोठा भाऊ अमिर शेख हे दोघेजण मारहाण करत होते. त्याचवेळी सलिम शेख याच्या हातात सुऱ्या सारखे धारदार हत्यार होते. त्यावेळी अमिर शेख याने सलीम सय्यद यांची कॉलर पकडून सलीम शेख यास म्हणाला की, डाल दे इसके पेट में. त्यानंतर सलीम शेख याने त्याच्या हातातील चाकू फिर्यादीचे मामा सलीम सय्यद यांच्या पोटात खुपसला.

यावेळी त्यांच्या पोटातून रक्तस्त्राव होऊ लागला. तसेच सलीम सय्यद ओरडत जमीनीवर खाली कोसळले. यावेळी फिर्यादी हे मध्ये पडले त्यांनी सय्यद यांना आरोपींच्या तावडीतून सोडवले. त्यावेळी अमिर शेख हा तेथून पळून गेला. मात्र सलीम याला फियोदी यांनी पकडून ठेवले. त्यानंतर रिक्षातून सलीम सय्यद यांना रूग्णालयात दाखल करण्यात आले. चाकुने सय्यद यांच्या पोटात भोसकल्याने त्यांना पोटावर आणि पाठीवर जखम झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०४ एप्रिल २०२५


## आयएमडीचा १० जिल्ह्यांना हाय अलर्ट



**धुळे :** जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील दहिवेल पिंपळनेर दरम्यान दुपारी २:४५ दरम्यान अवकाळी पावसासह गारपीट झाली. या गारपिटीने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. सकाळपासूनच वातावरणामध्ये उकाडा जाणवत होता, परंतु अवकाळी पावसाने काहीसा गारवा निर्माण केला आहे. मात्र तुरळक प्रमाणामध्ये गारपीट झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांनी गहू कापून शेतात ठेवला होता. त्याचे देखील नुकसान झाल्याचे बोलले जात आहे. अर्धा तास झालेला पावसाने शेतकऱ्यांचा तोंडाशी आलेला घास गेल्याने शेतकरी हवालदिल झाले आहे.

साक्री तालुक्यातील पिंपळनेर ते दहिवेल दरम्यान दुपारी झालेल्या अवकाळी पाऊस व बोधगाव चिंचपाडा परिसरात थोड्या प्रमाणामध्ये झालेल्या गारपिटीने या परिसरामध्ये अर्धा पाऊण तास झालेल्या अवकाळी पावसाने नुकसान झाल्याचे दिसून येत आहे. दहिवेल, बोधगाव, चिंचपाडा, धावलीविहीर या परिसरामध्ये अवकाळी पावसाने पाऊण तास चांगलेच झोडपून काढले. दुपारी तीन दहा ते साडेतीन दरम्यान बोधगाव चिंचपाडा परिसरात हरभऱ्याच्या आकाराची गारपीट झाल्याने ग्रामस्थांची चांगलीच तारांबळ उडाली. शेतकरी देखील शेतातील माल आवरण्यात व्यस्त दिसले.

राज्यात मागील काही दिवसांपासून ढगाळ वातावरण होते. त्यातच दोन दिवसांपासून अवकाळी पावसाने हजेरी लावली. यावेळी अनेक भागांमध्ये गारपिटीने देखील झोडपले. काल सातारा, सांगली जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्रात झालेल्या गारपिट आणि अवकाळी पावसामुळे शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तर या बदलत्या हवामानाचा नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादकांनाही मोठा फटका बसला आहे. द्राक्षांच्या दरात प्रति किलो २० रुपयांची घसरण झाली आहे.

दरम्यान, हवामान विभागाकडून राज्यात पुन्हा एकदा पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात वादळी पाऊस आणि गारपीटीची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली असून ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, पुणे, सातारा, अमरावती आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसाची शक्यता आहे. तर उर्वरित भागामध्ये हवामान विभागाकडून यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागांमध्ये तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे.






## कर्जमाफी करत राहणे हा शेतीवरचा उपाय नाही - आमदार सदाभाऊ खोत



**पुणे :** राज्यात महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. याची आठवण विरोधकांकडून करून दिली जात आहे. शेतकरी नेते राजू शेट्टी हे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. तसेच एफआरपीच्या दराबाबत सरकारच्या धोरणांवर त्यांनी टीका केली आहे. यावर रयत क्रांती संघटनेचे प्रमुख व आमदार सदाभाऊ खोत यांनी कर्जमाफी करत राहणे हा शेतीवरचा उपाय नाही, असे मत व्यक्त केले आहे.

सदाभाऊ खोत म्हणाले, आजचे जे कर्ज आहे ते शेतकऱ्यांच्या चुकीमुळे नाही तर ते सरकारच्या धोरणांमुळे आहे. या कर्जाची जबाबदारी केंद्राने आणि राज्याने घ्यावी, परंतु कर्जमाफी करत राहणे हा शेतीवरचा उपाय नाही, असे मत सदभाऊ खोत यांनी व्यक्त केले आहे. इंदापूर येथे पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी बोलताना त्यांनी शेती विषयक तसेच शरद पवारांवर देखील टीका केली आहे. तसेच मला राज्यपाल तरी करावे, अशी मागणी देखिल त्यांनी केली आहे.

सदाभाऊ खोत म्हणाले, खुली अर्थव्यवस्था शेती क्षेत्रात आली पाहिजे. शेतकऱ्याला जागतिक बाजारपेठा खुल्या झाल्या पाहिजेत, जगातील जागतिक तंत्रज्ञान त्याला मिळाले पाहिजे. मोठी गुंतवणूक शेतीत झाली तरच शेती तग धरू शकते. तसेच आजचे जे कर्ज आहे ते शेतकऱ्यांच्या चुकीमुळे नसून ते सरकारच्या धोरणांमुळे असल्याचे सदभाऊ खोत यांनी म्हटले आहे. तसेच कर्जमाफी हा शेतीवरचा उपाय नाही, असे स्पष्ट मत त्यांनी यावेळी मांडले आहे.

पुढे बोलताना सदाभाऊ खोत यांनी एफआरपीच्या मुद्द्यावर स्पष्ट भूमिका मांडली आहे. ते म्हणाले, शेतकारी विरोधी जे कायदे शेड्यूल ९ मध्ये आहेत, त्यामध्ये अत्यावश्यक वस्तू कायदा, कमाल जमीन धारणा कायदा हे पहिल्यांदा रद्द करा. पायाभूत सुविधा उभ्या राहतील, शेतीला भांडवल कर्जरूपाने उभा राहील. मात्र, ही सर्व बंधने ठेवून शेती क्षेत्रावरचा राबणारा माणूस हा गुलाम राहिला पाहिजे. गुलामावर राज्य करता येतं, आत्मनिर्भर माणसावरती राज्य करता येत नाही. म्हणून साखर कारखानदारी ही मूठभर लोकांच्या हातात ठेवली गेली.

शरद पवारांवर टीका करताना सदाभाऊ खोत म्हणाले, शरद पवार हे अनेक वर्ष केंद्रात मंत्री होते, त्यांचे केंद्रात वजन होते. परंतु, दोन साखर कारखान्यांच्यामधले अंतर पवार साहेब काढू शकले नाहीत. याचे कारण असे की २५ किलोमीटरच्या आतील शेतकऱ्यांच्या घरावर आपल्याला दरोडा घालता आला पाहिजे आणि तो कायदेशीर घालता आला पाहिजे, असे म्हणत सदाभाऊ खोत यांनी शरद पवारांवर टीका केली आहे.

पुढे बोलताना सदाभाऊ खोत म्हणाले, आमची मागणी आहे की दोन कारखान्यांमधील २५ किलोमीटर अंतराची अट काढून टाका, हे म्हणतात की कारखानदारी शेतकऱ्यांची आहे. जर अंतर काढले तरी कारखानदारी मोडीत निघेल, खाजगी लोक येतील. दुधात खासगी लोक पण आले आणि सहकारातील पण आहेत पण काय वाईट झाले? असा सवालही खोत यांनी उपस्थित केला.